आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२० मे २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- अमेरिकेतले उद्योग राज्यातल्या अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रात गुंतवणूक करण्याच्या मानसिकतेत असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- अखिल भारतीय औषध विक्रेता संघाच्या एकदिवसीय बंदला राज्यात ठिकठिकाणी प्रतिसाद

- नीट पेपरफुटी प्रकरणात 'सीबीआय'चे काल नागपूर आणि चंद्रपूर जिल्ह्यात तीन विद्यार्थ्यांच्या घरांवर छापे

**आणि**

- जातगणना करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय रद्द करण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली

**<><><><><>**

अमेरिकेतले उद्योग राज्यातल्या अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रात गुंतवणूक करण्याच्या मानसिकतेत आहेत असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं. खासगी कंपन्यांच्या सामाजिक जबाबदारी उपक्रमांमधून विविध लोककल्याणकारी योजना राबवण्यासाठी मुंबईत आयोजित टेक महाइंपॅक्ट या परिषदेच्या उद्घाटन सोहळ्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. ते म्हणाले....

**- - - होल्ड- बाईट देवेंद्र फडणवीस - - -**

उर्जेची गरज भागवण्यासाठी अणुऊर्जा आणि इतर पर्यायी स्त्रोतांचा वापर गरजेचा असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

भारत आणि इटली यांच्यातलं सहकार्य वृद्धिंगत करणं हे इटली भेटीचं उद्दिष्ट असून इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी यांच्यासोबत आज होणाऱ्या बैठकीबाबत आपण उत्सुक असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमाद्वारे म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि जॉर्जिया मेलोनी यांनी संध्याकाळचं जेवण एकत्र केलं. यावेळी दोघांमधे विविध विषयांवर चर्चा झाल्याचं मोदी यांनी सांगितलं. आजच्या भेटीत भारत-इटलीचे मैत्रिपूर्ण संबंध

पुढे नेण्याच्या दृष्टीने चर्चा केली जाईल, असं ते म्हणाले. रोममधे भारतीय समुदायाने केलेल्या स्वागताबद्दल प्रधानमंत्र्यांनी त्यांचे आभार मानले.

दरम्यान, भारतीय संस्कृतीचं दर्शन आपल्या कलेतून घडवणारे इटालीयन चित्रकार जांपालो तोमाहसेती यांची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरल्या पोस्टद्वारे प्रशंसा केली.

**<><><><><>**

अखिल भारतीय औषध विक्रेता संघानं विविध मागण्यांसाठी आज एकदिवसीय देशव्यापी संप पुकारला आहे. ऑनलाईन औषध विक्री बंद करणं, कॉर्पोरेट्सद्वारे अव्यावसायिक सवलत देणं बंद करणं, आणि बनावट औषध विक्रीला आळा घालणं, अशा औषध विक्रेत्यांच्या मागण्या आहेत. औषध विक्रीबाबत कठोर नियमावली आणि पारदर्शकता आवश्यक असून, यासाठी केंद्र सरकारने कायदे करावे, अशी मागणीही संघटनेनं केली आहे.

**यवतमाळ** इथं औषध विक्रेत्यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. या मोर्चात मोर्चात सहभागी विक्रेत्यांनी काळ्यात फिती बांधून निषेध नोंदवला. **सोलापुरात** डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत मोर्चा काढण्यात आला. मागण्या मान्य झाल्या नाही तर तीव्र आंदोलनाचा इशारा आंदोलकांनी दिला आहे. दरम्यान, रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी अन्न आणि औषध प्रशासन विभागानं एक दिवसीय नियंत्रण कक्ष सुरू ठेवले आहेत. **धुळ्यात**ही औषध विक्रेत्यांनी बंद पाळला तसंच जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. **रत्नागिरी**सह कोकणातल्या औषध विक्रेत्यांनी आजच्या संपात भाग घेतला. सरकारनं मागण्या पूर्ण केल्या नाहीत, तर बेमुदत संप करू असा इशारा आंदोलकांनी यावेळी दिला. बंदमुळे रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून अन्न आणि औषध प्रशासन कार्यालयामार्फत विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. **गोंदिया**त औषध विक्रेत्यांनी मूक मोर्चा काढून निषेध नोंदवला. तर **जळगाव** जिल्ह्यात खामगाव, शेगाव, जळगाव जामोद या शहरातल्या औषध विक्रेत्यांनी दुकानं बंद ठेवली आहेत.

दरम्यान, **अकोला** इथं एका नागरिकानं अन्न व औषध प्रशासन , जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि संबंधित अधिकाऱ्यांकडे या संपाविरोधात तक्रार दाखल केली आहे. बुलढाणा तसंच हिंगोली इथंही औषध विक्रेत्यांनी दुकानं बंद ठेवून तसंच मोर्चा काढून आंदोलन केल्याचं आमच्या वार्ताहरांनी कळवलं आहे.

**संपाच्या** पार्श्वभूमीवर रुग्णांची गैरसोय होऊ नये, यासाठी औषध आणि अन्न प्रशासनाने आवश्यक उपाययोजना केल्या असून, सर्व यंत्रणा सज्ज ठेवल्या आहेत. नागरीकांनी बंदच्या काळात अत्यावश्यक औषधांसाठी अन्न आणि औषध प्रशासनाच्या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा, असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

<><><><><>

अल्पसंख्यांकांचं सशक्तीकरण देशाच्या विकासासाठी आवश्यक असल्याचं मत महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे जिया खान यांनी व्यक्त केलं. नवी दिल्ली इथं आयोजित विविध राज्यांच्या अल्पसंख्यांक आयोगाच्या परिषदेत सहभागी झाल्यानंतर ते आज नागपुरात माध्यमांशी बोलत होते. विकसित देश घडवण्यासाठी अल्पसंख्यांक समाज मजबूत आणि सुरक्षित असणं अत्यंत गरजेचं आहे. अल्पसंख्यांक समाजातल्या सर्व धर्मीय नागरिकांसाठी शासनाच्या विविध योजना उपलब्ध असून त्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रामाणिकपणे करावी, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

<><><><><>

नीट पेपरफुटी प्रकरणात 'सीबीआय'नं काल नागपूर आणि चंद्रपूर जिल्ह्यात तीन विद्यार्थ्यांच्या घरांवर छापे टाकून झडती घेतली. या कारवाईदरम्यान, महत्त्वाची कागदपत्रं, हस्तलिखित नोट्स तसंच इलेक्ट्रॉनिक साहित्य जप्त करण्यात आलं. जप्त करण्यात आलेल्या नोट्स आणि फुटलेल्या प्रश्नपत्रिकांमध्ये साम्य आहे का, याची तपासणी आता फॉरेन्सिक पातळीवर केली जाणार आहे. देशभरातल्या किमान एक हजार विद्यार्थ्यांनी फुटलेले पेपर खरेदी केले असल्याचा सीबीआयचा अंदाज असल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

दरम्यान, नीट युजी फेरपरीक्षेचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली काल नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठक झाली. ही परीक्षा प्रामाणिकपणे आणि संपूर्ण पारदर्शकतेनं घेण्याचा पुनरुच्चार करत प्रधान यांनी परीक्षा प्रक्रियेत याआधी आढळून आलेल्या कोणत्याही त्रुटी न ठेवण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

<><><><><>

आगामी जनगणनेदरम्यान जातगणना करण्याचा केंद्रसरकारचा निर्णय रद्द करण्याची मागणी करणारी याचिका आज सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. सरकारला कल्याणकारी

योजना राबवण्यासाठी मागासवर्गीय लोकसंख्या नेमकी माहीत असणं गरजेचं आहे, असं मत प्रदर्शित करत सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील पीठानं सरकारच्या धोरणात्मक निर्णयात हस्तक्षेप करायला नकार दिला.

<><><><><>

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवण बंदर क्षेत्रात येत्या २६ मे पासून सर्व प्रकारची प्रवासी जलवाहतूक आणि व्यावसायिक जलक्रीडा प्रकार पूर्णपणे बंद ठेवण्याचे आदेश महाराष्ट्र सागरी मंडळाने जारी केले आहेत. हा बंदी आदेश ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत लागू राहणार आहे. प्रादेशिक बंदर अधिकाऱ्यांनी सर्व बंदर निरीक्षक, सहायक बंदर निरीक्षक यांना याबाबतचे आदेश दिले आहेत.पावसाळी हंगामाची सुरुवात आणि समुद्रातले संभाव्य धोके लक्षात घेता हा निर्णय घेण्यात आला आहे. गेल्या वर्षी २० मे रोजी झालेल्या तुफानी पावसामुळे जलपर्यटन थांबवण्यात आलं होतं.

दरम्यान, रायगड जिल्ह्यातला ऐतिहासिक जंजिरा किल्ला देखील येत्या २६ मेपासून तीन महिन्यांकरता पर्यटकांसाठी बंद ठेवण्यात येणार आहे.

<><><><><>

मुंबई- गोवा महामार्गाचं काम अजून अपूर्ण असलं तरीही रायगड जिल्ह्यात खारपाडा इथे टोल वसुली सुरू करण्यात आली आहे. ही टोलवसुली अन्यायकारक असल्याचं रायगड प्रेस क्लबनं म्हटलं असून टोलवसुली त्वरित स्थगित करावी या मागणीकरता उद्या आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

<><><><><>

नागपूर जिल्ह्यातल्या ईशापूर गावा जवळ आज पहाटे विटांनी भरलेला एक ट्रक उलटल्याने झालेल्या अपघातात तीन मजुरांचा मृत्यू झाला, तर तीन जण जखमी झाले आहेत. ईशापूर जवळ चालकाचं नियंत्रण सुटलं आणि अपघात झाला. मृतांची ओळख पटली असून जखमींना जवळच्या सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. ट्रकचा चालक फरार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

<><><><><>

वरिष्ठ सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांची एफ डी ए, अर्थात अन्न आणि औषध प्रशासनाच्या आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. एफडीएचे आयुक्त श्रीधर दुबे यांची

मुंबई महानगर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मुख्यकार्यकारी अधिकारी या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. कान्हुराज बगाटे यांची नियुक्ती महामुंबई मेट्रो संचालन महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकपदी करण्यात आली आहे. तसंच आर एस चव्हाण यांना हाफकीन जीव औषध निर्माण महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे.

<><><><><>

माजी केंद्रीय मंत्री आणि उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री भुवनचंद्र खांडुरी यांच्या पार्थिवावर आज हरिद्वार इथं शासकीय इतमामाने अंतिम संस्कार करण्यात आले.

उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी आज खांडुरी यांच्या पार्थिवाचं दर्शन घेऊन आदरांजली वाहिली.

//<><><><><>//